संपुर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे एकमेव मराठी वृत्तपत्र

# जागृत शोध



JAGRUT SHODHA

RNI.Reg.No.MAHMAR/2009/37305

**संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा प्रतिनिधी व तालुक्यात तालुका प्रतिनिधी नेमणे आहेत.**
**संपर्क - ८००७०७२८२८**

वर्ष १७ वे अंक २१ वा सोमवार दि १७ ते २३ जुलै २०२३ संपादक भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर मो ८००७०७२८२८ उपसंपादक राजेश जगताप

# राज्य मंत्रिमंडळाचे फेरबदलासह खातेवाटप जाहीर

मुंबई (प्रतिनिधी)- राज्य मंत्रिमंडळातील नवनियुक्त मंत्र्यांच्या खातेवाटपाबरोबरच सध्याच्या मंत्र्यांच्या खात्यांमध्ये देखील काही फेरबदल करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज खातेवाटप जाहीर केले आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी मंजुरी दिल्यानंतर हे खातेवाटप जाहीर करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सामान्य प्रशासन, नगर विकास, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना वाटप न केलेले विभाग उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा, राजशिष्टाचार ही खाती असतील.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे वित्त व नियोजन हे खाते राहील. इतर २६ मंत्र्यांची खाती पुढीलप्रमाणे:

छगन भुजबळ - अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, दिलीपराव दत्तात्रय वळसे-पाटील - सहकार, राधाकृष्ण विखे-पाटील - महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास, सुधीर सच्चिदानंद म ुनगंटीवार- वने, सांस्कृतिक कार्य, व मत्स्य व्यवसाय, हसन मियाँलाल मुश्रीफ - वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य, चंद्रकांतदादा बच्चू पाटील - उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य, विजयकुमार कृष्णराव गावित- आदिवासी विकास, गिरीष दत्तात्रय महाजन- ग्राम विकास आणि पंचायत राज, पर्यटन, गुलाबराव पाटील- पाणीपुरवठा व स्वच्छता, दादाजी दगडू भुसे- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), संजय दुलिचंद राठोड- मृद व जलसंधारण, धनंजय पंडितराव मुंडे - कृषि, सुरेशभाऊ दगडू खाडे- कामगार, संदीपान आसाराम भुमरे- रोजगार हमी योजना व फलोत्पादन

उदय रविंद्र सामंत- उद्योग, प्रा.तानाजी जयवंत सावंत- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, रवींद्र दत्तात्रय चव्हाण - सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अब्दुल सत्तार- अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन, दीपक वसंतराव केसरकर- शालेय शिक्षण व मराठी भाषा, धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम - अन्न व औषध प्रशासन, अतुल मोरेश्वर सावे - गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याण, शंभूराज शिवाजीराव




देसाई- राज्य उत्पादन शुल्क, कु. अदिती सुनिल तटकरे - महिला व बालविकास, संजय बाबुराव बनसोडे - क्रीडा व युवक कल्याण, बंदरे, मंगलप्रभात लोढा- कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता, अनिल पाटील - मदत पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन.

# चांदणी चौकातील उड्डाणपुलाच्या कामाची पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडून पहाणी

## उड्डाणपूल प्रकल्पाचे उर्वरित काम गतीने करण्याच्या सूचना





पुणे (प्रतिनिधी)- पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज चांदणी चौकातील उड्डाणपूल प्रकल्पाच्या कामास भेट देऊन पाहणी केली. उड्डाणपूल प्रकल्पाचे उर्वरित काम गतीने पूर्ण करावे आणि उद्घाटन कार्यक्रमाचे योग्य नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी प्रकल्प संचालक संजय कदम, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर, माजी नगरसेवक किरण दगडे पाटील, दीपक पोटे, अमोल बालवडकर, म ाजी नगरसेविका अल्पना वर्पे, आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून पुण्यातील चांदणी चौकात उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुला प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून येत्या १२ ऑगस्ट रोजी केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते लोकार्पण करण्याचे नियोजित आहे. या पार्श्वभूम ीवर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्यादृष्टीने श्री. पाटील यांनी चांदणी चौक येथे भेट दिली.

पुण्यातील चांदणी चौकातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून चांदणी चौकात उड्डाणपूल, सेवा रस्ता उभारण्यात येत असून, सध्या या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. लवकरच सर्व काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती प्रकल्प संचालक संजय कदम यांनी यावेळी पालकमंत्री श्री. पाटील यांना दिली.

पुणेकरांसाठी चांदणी चौक हा अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे त्याचे उर्वरित काम जलदगतीने पूर्ण करावे. त्यासोबतच कामात कोणतीही त्रुटी राहू नये, याची खबरदारी घ्यावी. पावसाची शक्यता लक्षात घेऊन, उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन करावे, अशा सूचना यावेळी पालकमंत्री पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# अल्पसंख्याक शाळा आणि विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करणार-शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर

पुणे (प्रतिनिधी)- अल्पसंख्याक संस्था, शाळा आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले.

अल्पसंख्याक संस्था, शाळा आणि विद्यार्थी यांच्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका व राज्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमार्फत गुणवत्ता वाढीसाठी तयार करण्यात आलेल्या निवडक विशेष उपक्रम पुस्तिकेच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक संपत सुर्यवंशी, शिक्षण संचालक (योजना) डॉ. महेश पालकर आदी उपस्थित होते.

श्री. केसरकर म्हणाले, अल्पसंख्याक शाळा, संस्था यांना शासनाकडून विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत, त्याचा त्यांनी लाभ घ्यावा. अल्पसंख्याक शाळेम ध्ये ५० टक्के पदे भरण्यास परवानगी दिली असल्याने त्यांनी भरती प्रक्रिया राबवावी. अल्पसंख्याकांच्या दोन प्रकारच्या शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळेत ८ वी पर्यंतचे शिक्षण दिले जाते. बहुसंख्य अल्पसंख्यांक मुली ८ वी नंतर शाळा सोडतात. याठिकाणी ९ वी आणि १० वी चे वर्ग सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. राज्यात वेगवेगळ्या १० भाषेम ध्ये आपण शिक्षण देत असल्याचे त्यांनी सांगितले.



नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्य विकास अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात येणार असून मातृ भाषेतून शिक्षण देण्यात येणार आहे. मातृभाषेतील शिक्षणाला आपण अनिवार्य करत आहोत. याम ुळे विद्यार्थ्यांना चांगले ज्ञान मिळेल. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा पाया भक्कम करणे आवश्यक आहे. शासनातर्फे विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पुस्तके अन्य सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत. राज्यात शिक्षकांची ५० हजार पदे टप्प्याटप्प्याने भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सूरु आहे.

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शिक्षकांनाही प्रशिक्षण देण्यात येत आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी. शाळेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षण प्रणाली अवलंबिण्यात यावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

श्री. मांढरे म्हणाले, अल्पसंख्याक संस्था, शाळा व विद्यार्थ्यांसाठी शासनाच्यावतीने विविध योजना सुरु केल्या आहेत. शालेय शिक्षण घेणाऱ्यांसाठी संबंधित योजनांची माहिती संकलित करणे आवश्यक होते. क्षेत्रिय स्तरावर अल्पसंख्याक विद्यार्थी व अल्पसंख्याक संस्था संचलित शाळा यांच्याबाबत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर मुदतीत कार्यवाही होण्याच्यादृष्टिने कार्यपद्धतीविषयी संदिग्धता राहू नये यासाठी सर्व कायदेशीर तरतुदी, महत्वाचे शासन निर्णय, शासन परिपत्रके व न्यायालयीन आदेश यावर आधारित व गुणवत्ता वाढीसाठी निवडक विशेष उपक्रमावर पुस्तीका तयार करण्यात आल्या आहेत. याचा अल्पसंख्याक विद्यार्थी, संस्था यांना लाभ होईल.

यावेळी मंत्री श्री. केसरकर यांच्या हस्ते प्रशासन व अल्पसंख्याक संस्था, शाळा आणि विद्यार्थी यांच्यासाठीची मार्गदर्शक पुस्तिका व राज्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमार्फत गुणवत्ता वाढीसाठी निवडक विशेष उपक्रम पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येऊन पुस्तीका निर्मिती करण्याम ध्ये योगदान देणाऱ्या संस्था व व्यक्तिंचा सत्कार करण्यात आला.

# जलयुक्त शिवार अभियानातुन गावे जलस्वयंपुर्ण करण्याबरोबरचशेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्न वाढीसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ द्या - जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

अहमदनगर (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांच्या शेतीला शाश्वत पाणी मि ळुन पीक उत्पादन वाढीसाठी जलयुक्त शिवार अभियान टप्पा दोन योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात यावी. या योजनेच्या माध्यमातुन गावे जलस्वयंपुर्ण करण्याबरोबरच निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये शासनाच्या विविध योजनांचा लाभ देऊन शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जलयुक्त शिवार अभियान टप्पा दोन, जलशक्ती अभियान व अमृत सरोवर या विषयांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री सालीमठ बोलत होते.

बैठकीस समितीचे सदस्य पद्मश्री पोपटराव पवार, उपजिल्हाधिकारी (रोहयो) गंगाराम तळपाडे, जिल्हा जलसंधारण अधिकारी मनोज ढोकचौळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, नगरपालिका प्रशासनाचे सहआयुक्त प्रशांत खांडकेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

**२५७ गावांमध्ये जलसंधारणाची कामे गतीने करा**

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ म्हणाले की, जलयुक्त शिवार अभियान टप्पा दोन मध्ये जिल्ह्यातील २५७ गावांची निवड करण्यात आली आहे. निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये जलसंधारणाची कामे गतीने करण्याबरोबरच काम ासंदर्भात असलेल्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात याव्यात. जलयुक्त शिवार अभियान टप्पा दोन बाबतची माहिती गावामध्ये होणाऱ्या ग्रामसभांमधुन प्रत्येक गावकऱ्यापर्यंत पोहोचविण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी श्री सालीमठ यांनी यावेळी केल्या.

जलयुक्त शिवार अभियानातुन गावे जलस्वयंपुर्ण करण्याबरोबरच शेतीला जोडधंदा म्हणुन उपयुक्त ठरणाऱ्या बाबींना प्राधान्य देण्यात यावे. केंद्र व राज्य शासनाच्या शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना आहेत. या सर्व योजना या गावांमध्ये राबविण्यात येऊन त्याचा लाभ शेतकऱ्यांना द्यावा. गावामध्ये फेरफारची प्रलंबितता, शेतरस्ते म ोकळे करणे, गावांना अखंडित वीज पुरवठ्यासाठी सोलारचा वापर, प्रत्येक गाव कचरामुक्त व हागणदारीमुक्त करणे यासह इतर नाविन्यपूर्ण उपक्रम राबवुन निसर्गपुरक गावे निर्माणावर अधिक भर द्यावा. शासनाने एक रुपयामध्ये पीकविमा देण्याची योजना सुरु केली असुन या योजनेमध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांना सहभागी करुन घेण्यासाठी याची अधिक प्रमाणात जनजागृती करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी यावेळी दिल्या.

**अमृत सरोवर व जलशक्ती अभियानाचा घेतला आढावा**

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या अमृत सरोवर व जलशक्ती अभियानाचाही जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर आढावा घेत पडणाऱ्या पावसाचा थेंब न् थेंब साचविण्यासाठी प्रत्येक शासकीय,निमशासकीय



कार्यालयामध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प प्राधान्याने राबविण्यात यावा. जिल्ह्यात ११६ ठिकाणी अमृत सरोवरची कामे सुरु असुन ही कामे करत असताना ती दर्जेदार, गुणवत्तापुर्ण करण्याबरोबरच सर्वसामान्यांना त्याचा वापर होईल, अशा पद्धतीने करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

**विकासात्मक धोरणामध्ये जिल्ह्याचा मोलाचा वाटा - पद्मश्री पोपटराव पवार**

पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, जलयुक्त शिवार अभियान टप्पा दोनच्या माध्यमातुन जिल्ह्यातील २५७ गावांम ध्ये जलसंधारणाची कामे करण्यात येत आहेत. जलसंधारणांच्या कामांमध्ये नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्याची गरज असुन योजनेच्या अंमलबजावणीमध्ये एनएसएस व एनसीवी विद्यार्थ्यांचा सहभाग मोलाचा ठरेल. योजनेसाठी निधीची कमतरता नसुन कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्यांची सोडवणुक करण्याची आवश्यकता आहे. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या यशस्वीतेमध्ये जनसहभाग अत्यंत महत्वाचा असुन त्याचे उदाहरण म्हणजे हिरवेबाजार आहे. विकासात्मक धोरण तयार करण्यामध्ये अहमदनगर जिल्ह्याचा नेहमीच म ोलाचा वाटा राहिलेला असुन त्यादृष्टीने जलसंधारणाची कामे व्हावीत, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी जलशक्ती अभियानांतर्गत तयार करण्यात आलेल्या माहितीपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. बैठकीस संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# संपादकीय....

## अभिनेता रविंद्र महाजनींचा प्रवास

देखणे आणि रुबाबदार अशा रवींद्र महाजनी यांनी मराठी चित्रपटसृष्टीत एक काळ गाजवला होता. त्यांच्या निधनाने जिद्दीने आणि कष्टाने चित्रपटात यशस्वी कारकीर्द करणारा गुणी अभिनेता हरपला आहे....

मराठी चित्रपटसृष्टीला जे काही मोजके देखणे, रुबाबदार नायक लाभले, त्यात रवींद्र महाजनी यांचा क्रम निश्चितच वरचा होता. चंद्रकांत, सूर्यकांत आणि अरुण सरनाईक यांच्यानंतर ही देखण्या नटांची परंपरा रवींद्र महाजनींनी पुढे चालविली. उंचीपुरी शरीरयष्टी, आकर्षक गोलाईचा चेहरा, वाऱ्यावर उडणारे केस असं रूप लाभलेले रवींद्र महाजनी यांनी सत्तर आणि ऐंशीचं दशक गाजवलं. अभिनेत्री रंजनासोबत त्यांची जोडी विशेष जमली. 'मुंबई दूरदर्शन' नवीन सुरू झालं, तेव्हा दर शनिवारी संध्याकाळी मराठी चित्रपट दाखविला जायचा. महाराष्ट्रभर तेव्हा गावोगावी, मोजक्याच कृष्णधवल दूरचित्रवाणी संचांसमोर, प्रसंगी 'मुंग्या-मुंग्यां'च्या गर्दीतून - हा मराठी चित्रपट बघायला तोबा गर्दी व्हायची. त्या छोट्या स्क्रीनमधून, काळ्या-पांढऱ्या रंगांतूनही रवींद्र महाजनींचं देखणेपण पाहणाऱ्याच्या नजरेत ठसायचं. 'झुंज', 'लक्ष्मीची पावले', 'आराम हराम है', 'देवता', 'मुंबईचा फौजदार', 'हळदी-कुंकू', 'दुनिया करी सलाम', 'गोंधळात गोंधळ' या आणि अशा अनेक मराठी चित्रपटांतून त्यांचं दर्शन व्हायचं. 'फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश' हे श्रीधर फडके यांनी संगीत दिलेले पहिले गाणे रवींद्र महाजनी आणि रंजना याच जोडीवर चित्रित झाले होते. 'आकाशी झेप घे रे पाखरा, तोडी सोन्याचा पिंजरा' हे सुधीर फडके यांनी गायिलेले अजरामर गाणेही रवींद्र महाजनींनीच पडद्यावर साकार केले. 'मुंबईचा फौजदार' आणि 'देवता' या चित्रपटांतील तर सर्वच गाणी गाजली. रवींद्र महाजनींनी तो एक काळ गाजविला, हे नक्की.

'लोकसत्ता'चे दुसरे संपादक, ज्येष्ठ पत्रकार ह. रा. महाजनी यांचे रवींद्र हे सुपुत्र. त्यांचा जन्म बेळगावचा. रवींद्र दोन वर्षांचे असताना वडिलांनी नोकरीसाठी मुंबईला मुक्काम हलविला. शाळेत असल्यापासूनच रवींद्र यांना अभिनयाची अतिशय आवड होती. मोठं झाल्यानंतर नाटकात-चित्रपटातच जायचं, हे त्यांनी आधीच ठरवलं होतं. शाळेतही ते स्नेहसंमेलनात, अनेक स्पर्धांमध्ये भाग घेत असत. इंटर सायन्सच्या परीक्षेत नापास रवींद्र महाजनी स्वाभाविकच अतिशय निराश. तेव्हा ह. रा. महाजनी यांनी त्यांना पदवी शिक्षण पूर्ण करण्याचा सल्ला दिला. मग रवींद्र यांनी खालसा महाविद्यालयामध्ये बी.ए.साठी प्रवेश घेतला. त्या वेळी त्यांच्या महाविद्यालयात रॉबिन भट्ट, रमेश तलवार, अवतार गिल, शेखर कपूर आदी मंडळी होती. सगळ्यांनाच अभिनयाची आणि चित्रपटांची मोठी आवड. शिक्षण पूर्ण करून सिनेमात जायचं, असे सगळ्यांनी तेव्हाच ठरवून टाकलं होतं. त्या वेळी ते वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये नाटकं सादर करायचे. अशोक मेहताही त्यांच्यासोबत असायचे. चित्रपटात गेल्यावर काय काय करायचं, हेही त्याच वेळी त्यांनी ठरवून टाकलं होतं. शेखर कपूर यांना दिग्दर्शनाची आवड होती, रमेश तलवार, अवतार गिल यांच्यासोबत रवींद्र महाजनींना अभिनयाची आवड होती. रॉबिन भट्ट यांना लेखनाची आवड होती, तर अशोक मेहता यांना कॅमेरामन व्हायचे होते. आपापल्या आवडीप्रमाणे सगळे त्या त्या क्षेत्रात स्थिरावले आणि यशस्वी झाले.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रवींद्र महाजनी यांनी चित्रपटसृष्टीत नशीब अजमावण्यासाठी प्रयत्न सुरू केले. वडिलांच्या निधनानंतर आर्थिक जबाबदारीही त्यांच्यावर पडली होती, त्यामुळे कमाई करणे आवश्यक होते; म्हणून काही काळ त्यांनी छोटी-मोठी कामे केली. काही वर्षे टॅक्सीसुद्धा चालविली. 'लोकसत्ता'च्या संपादकांचा मुलगा टॅक्सी चालवतो म्हणून नातेवाइकांकडून बरीच टीकाही सहन करावी लागली; पण रवींद्र महाजनी आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. दादरला रणजित, रूपतारा, श्री साउंड, राजकमल आदी स्टुडिओंबाहेर रवींद्र महाजनी आपली टॅक्सी घेऊन थांबायचे, अशी आठवण त्यांचे मित्र सांगतात.

ज्येष्ठ नाटककार मधुसूदन कालेलकर यांच्या 'जाणता-अजाणता' या नाटकातून म हाजनींना खऱ्या अर्थाने पहिली संधी मिळाली. महाजनींनी साकारलेली त्यातली मुख्य भूमिका गाजली. त्यानंतर कालेलकरांनी खास त्यांच्यासाठीच 'तो राजहंस एक' हे नाटक लिहिले. चित्रपती व्ही. शांताराम यांनी या नाटकाचा एक प्रयोग पाहिला आणि रवींद्र महाजनींना 'झुंज' या चित्रपटात मुख्य भूमिकेची संधी दिली. सन १९७४मध्ये आलेला हा चित्रपट खूप गाजला आणि त्यानंतर रवींद्र महाजनी नावाचा नवा तारा मराठी चित्रपटसृष्टीला मिळाला. या चित्रपटाने त्यांचा नऊ वर्षांचा संघर्ष संपविला. 'झुंज'ने रौप्यमहोत्सवी यश मि ळवलं आणि महाजनींकडे मराठी चित्रपट निर्मात्यांची रांग लागली. त्यानंतर 'आराम हराम आहे', 'लक्ष्मी', 'लक्ष्मीची पावले', 'देवता' असे अनेक यशस्वी चित्रपट महाजनींच्या खात्यावर जमा झाले. 'गोंधळात गोंधळ', 'मुंबईचा फौजदार' असे विनोदी ढंगाचे हलकेफ ुलके चित्रपटही त्यांनी केले आणि त्यांनाही यश मिळाले. त्या काळात तमाशापटांची आणि ग्रामीण पार्श्वभूमीच्या चित्रपटांची चलती होती; तरीही महाजनींसारखा 'तारा' मिळाल्यानंतर मराठी निर्मात्यांनी त्यांच्या शहरी रूपाला शोभून दिसतील, अशा कथा शोधायला सुरुवात केली आणि मराठी चित्रपटांतील सामाजिक आशय पुन्हा वाढीला लागला. चांगली कथा-पटकथा आणि रवींद्र महाजनी यांचे देखणे रूप, हे समीकरण १९७५ ते १९९० या काळात छान जुळून आले होते. अरुण यांच्या आकस्मिक निधनानंतर महाजनींनी त्यांच्या 'बेलभंडार', 'अपराध मीच केला' या नाटकांचे अनेक प्रयोग केले.

सन १९९०नंतर महाजनी चरित्र भूमिकांकडे वळले. काही दूरचित्रवाणी मालिकांमध्येही त्यांनी काम केले. 'सत्तेसाठी काहीही' या चित्रपटाच्या माध्यमातून त्यांनी निर्मितीच्या आणि दिग्दर्शनाच्या क्षेत्रात प्रवेश केला. २०१५नंतर त्यांनी 'काय राव तुम्ही', 'कॅरी ऑन मराठा', 'देऊळ बंद', 'पानिपत' अशा काही चित्रपटांतूनही भूमिका केल्या.

मध्यंतरी चित्रपटांतून काम करणे थांबविल्यानंतर त्यांनी बांधकाम क्षेत्रात नशीब आजमावण्याचा प्रयत्न केला. मात्र, भागीदाराकडून त्यांची फसवणूक झाली आणि रवींद्र महाजनी कर्जात बुडाले. त्यांचा मुलगा गश्मीर याने वयाच्या पंधराव्या वर्षापासून काम करून वडिलांचे कर्ज फेडले. त्यासाठी त्याने डान्स ॲकॅडमी सुरू केली. आता गश्मीरही चित्रपटसृष्टीत स्थिरावला आहे.

रवींद्र महाजनी गेल्या सात-आठ महिन्यांपासून तळेगावजवळ एका फ्लॅटमध्ये राहत होते. तिथेच त्यांना एकाकी अवस्थेत मृत्यूने गाठले. अतिशय दुर्दैवी अशी ही घटना घडली. त्यांच्याच 'देवता' या चित्रपटातील गाण्यांचे बोल उसने घेऊन म्हणायचे तर -

दैवलेख ना कधी कुणा कळला
खेळ कुणाला दैवाचा कळला...

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या निकषात उत्पन्न मर्यादेत वाढ केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांकडून प्रधानमंत्र्यांचे आभार

मुंबई, दि. १५ : - मुंबई महानगर क्षेत्र -एमएमआर मध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी (एथड) प्रधानमंत्री आवास योजनेतील परवडणाऱ्या घरांसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे, उत्पन्नाची मर्यादा आता तीन लाखांवरुन सहा लाख रुपये करण्यात आली असून या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी काम काज मंत्री हरदिप सिंह पुरी यांचे आभार मानले आहेत. या निर्णयामुळे म्हाडा, सिडकोच्या घरांसाठी अर्ज करणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा मिळाला असून सर्वसामान्यांचं हक्काच्या घराचं स्वप्न साकार होण्यास मदत होणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत मुंबई म हानगर क्षेत्रासाठी आर्थिक दुर्बल घटकांसठी उत्पन्नाचे निकष तीन लाखांवरून सहा लाख रुपये करण्याची विनंती मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केंद्राकडे २१ जून २०२३ रोजी पत्राद्वारे केली होती, त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याचा पाठपुरावा केला. या विनंतीला केंद्राने सकारात्मक प्रतिसाद देऊन उत्पन्नाच्या निकषात वाढ केली असल्याचे राज्य शासनाला कळविले आहे.

# डिजिटल इंडिया सप्ताह २५ जुलैपासून नागरिकांना मिळणार केंद्रीय योजनांची माहिती




पुणे (प्रतिनिधी)- भारत सरकारतर्फे २५ ते ३१ जुलै दरम्यान 'डिजिटल इंडिया' सप्ताह साजरा करण्यात येणार असून र्व नागरिकांना ई-गव्हर्नन्स सेवांबद्दल माहिती देण्यात येणार आहे. तंत्रज्ञानाचा अधिकवापर व्हावा यासाठी हा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी नोंदणी केल्यास नागरिकांना विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेता येईल.

भारताचे तंत्रज्ञान क्षेत्रातील काम जगासम ोर आणणे, टेक स्टार्टअप साठी सहयोग व व्यवसायाच्या नवीन संधी शोधणे, नवीन पिढीला प्रेरणा देणे, नागरिकांना ई-गव्हर्नन्स सेवांची माहिती देणे आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे यासाठी या सप्ताहाचे आयोजन होत आहे. याअंतर्गत राष्ट्रीय स्तरावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून त्यात सहभागी होण्यासाठी http://www.nic.in/diw2023-reg ह्या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

माहिती तंत्रज्ञान विषयाच्या विद्यार्थ्यांनाही या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान विषयांवरील

व्याख्याने व चर्चा यामध्ये सहभागी होण्याची विनामूल्य संधी याद्वारे उपलब्ध होईल. अधिकाधिक नागरिकांनी नोंदणी करून ह्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी प्रमोद बोरोले यांनी केले आहे.

## राज्यातील युवक अधिकाधिक संख्येनं खेळांकडे वळतील - उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई, दि. १४ :- क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्य शासनाचा 'शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झालेले श्रीकांत वाड, दिलीप वेंगसरकर, आदिल सुमारीवाला या मान्यवरांचं उपमुख्यमंत्री तसेच महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी अभिनंदन केले आहे.

राज्य शासनाच्यावतीने दिले जाणारे, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक- जिजामाता पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, शिवछत्रपती साहसी क्रीडा पुरस्कार, दिव्यांग बांधवांसाठीचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार आज क्रीडा क्षेत्रातील ११७ मान्यवरांना जाहीर झाले. या सर्व खेळाडू, प्रशिक्षक, मार्गदर्शकांचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या खेळाडूंनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात महाराष्ट्राचा गौरव वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचं, दिलेल्या योगदानाचा महाराष्ट्राला अभिमान आहे. या खेळाडूंपासून प्रेरणा घेऊन राज्यातील युवक अधिकाधिक संख्येने खेळांकडे वळतील, क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करुन महाराष्ट्राचं अव्वल स्थान कायम राखतील, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० बाबत शेतकरी खातेदारांना आवाहन

पुणे दि.१४: भोर-वेल्हा उपविभागात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० साठी भाडेतत्वावर जमीन देण्यासाठी पात्र व इच्छुक शेतकरी खातेदार व जमीन धारकांनी पुढील दोन दिवसांत संपर्क अधिकाऱ्यांशी आवश्यक माहितीसह संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० करिता वेल्हा तालुक्यातील पाबे, आणि भोर तालुक्यातील कामथडी, खानापूर आणि निगुडघर या सब स्टेशनच्या पाच कि.मी. च्या परिघातील कमीत कमी तीन एकर सलग असलेली खाजगी जमीन महावितरण कंपनीस भाडे तत्वावर हवी आहे. त्याबदल्यात प्रती एकर प्रती वर्ष ५० हजार रुपये अथवा प्रती हेक्टरी प्रती वर्ष १ लाख २५ हजार रुपये इतके वार्षिक भाडे सदर कंपनी देणार असून यामध्ये प्रती वर्ष ३ टक्के इतकी वाढ कंपनीकडून देण्यात येणार आहे.

इच्छुक शेतकऱ्यांनी पाबे आणि काम थडी सबस्टेशनसाठी महावितरणचे नसरापूर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता नवनाथ घाटुळे (मो.क्र.७८७५७६७७०६ ), तर खानापूर आणि निगुडघर सबस्टेशनसाठी भोर उपविभागाचे प्रभारी उपकार्यकारी अभियंता सचिन राऊत (मो.क्र. ७८७५७६८२२५) या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे यांनी कळविले आहे.

## अक्कलकोट पोलीस ठाण्यातील स्वच्छतागृहाची दुरवस्था

अक्कलकोट, (प्रतिनिधी ) - सरकारकडून स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस ठाण्यांना दरवर्षी पारितोषिकही दिले जाते. सातत्याने स्वच्छतेचा आग्रह धरला जात असताना येथील पोलीस ठाण्याच्या ढिसाळ नियोजनाम ुळे स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली असून कर्मचाऱ्यांसह येथे येणाऱ्या नागरिकांना नाकाला रूमाल लावण्याची वेळ आल्याने संताप व्यक्त होतो आहे.

येथील दक्षिण पोलीस ठाण्याच्या कार्यालयाचे साफसफाईकडे दुर्लक्ष होत आहे. दक्षिण पोलीस ठाण्याच्या कार्यालयात दोन स्वच्छतागृह आहेत. परंतु त्या आहे.

स्वच्छतागृहाला दरवाजे नाहीत. तसेच पाणीही उपलब्ध नाही. शिवाय स्वच्छतागृहांम ध्ये शिल्लक साहित्य, तुटलेल्या फरशी, स्टील, कोळ्याचे जाळे झाल्याचे दिसून येत आहे. या पोलीस ठाण्यात येणाऱ्या तालुकावासियांना अस्वच्छता असल्याचे दिसून येत आहे. यामुळे नागरिक व महिला वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे. स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली असताना पोलीस ठाण्याच्या ढिसाळ नियोजनाचा नागरिकांनाही मोठा फटका बसतो आहे. याकडे पोलीस उपविभागीय अधिकारी व पोलीस निरीक्षक यांनी लक्ष देऊन स्वच्छता गृहाच्या दुरवस्थेचा प्रश्न लवकरात लवकर म ार्गी लावावा, अशी मागणी नागरिकांकडून होत

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या हस्ते 'करिअर कट्टा' अंतर्गत करिअर संसदेचे उद्घाटन

पुणे, दि. १४: 'करिअर कट्टा' च्या माध्यमातून राज्यातील म हाविद्यालयात अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून युवकांच्या विकासासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

सर परशुराम महाविद्यालयात आयोजित 'करिअर कट्टा' अंतर्गत करिअर संसद कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रम ाला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण प्रसारक नियामक मंडळाचे अध्यक्ष ड. एस. के. जैन, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, सेंटर ऑफ एक्सलन्स समिती करिअर कट्टाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, स.प. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुनील गायकवाड, चॉइस ग्रुपचे फिरोदिया गाडिया आदी उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले, 'करिअर कट्टा'च्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा, महाराष्ट्र व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा, उद्योजकता व्यक्तिमत्व विकास, व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे म ार्गदर्शन, वित्त व्यवस्थापन पोलीस भरती, बँकींग सेवा, कमिशन अशा विविध अभ्यासक्रमाचे ३६५ रुपयांमध्ये मार्गदर्शन करण्यात येत असून त्यातून विद्यार्थ्यांना यश मिळत आहे, ही समाधानाची बाब आहे. विद्यार्थ्यांना फक्त मार्गदर्शन करुन चालणार नाही त्यांना सर्वदृष्टीने पाठबळ मिळणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी औद्योगिक कंपन्याशी समन्वय करुन विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात कामाच्या ठिकाणचे ज्ञान मिळण्याच्यादृष्टिने प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांन यावेळी दिले.

केंद्र शासनाने सन २०२० साली नवीन शैक्षणिक धोरणाची घोषणा केली असून आज त्याला तीन वर्ष पूर्ण होत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणात पारंपरिक कला, वाणिज्य या सारख्या शिक्षण पद्धतीत बदल करून कौशल्य विकास, मातृभाषेतून शिक्षण, नैतिक बहुमुखी शिक्षण आणि आपल्या परंपरेचा अभिमान असणाऱ्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात येणार आहे. मातृभाषेतील शिक्षणामूळे विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान चांगल्याप्रकारे होऊन संशोधनाची वृत्ती वाढेल. अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम मराठीतून करण्याला प्राधान्य देण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

श्री. देवळाणकर म्हणाले, स्पर्धा परीक्षेत मराठी टक्का वाढविण्याच्या दष्टिने 'करिअर कट्टा' चा उपक्रम अत्यंत महत्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा आणि त्यांची संवेदनक्षमता वाढवणारा हा उपक्रम असून केंद्रीय लोकसेवेमध्ये मराठी प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. फक्त पुणे, मुंबई पुरताच हा उपक्रम न राहता राज्यातील ग्रामीण भागात हा उपक्रम राबविण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. विद्यार्थ्यांना कौशल्य युक्त बनविण्यासाठी करिअर कट्टाने सहभाग घेतला आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

करिअर कट्टाच्या अभियानात विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय, बारामती यांनी १६२ विद्यार्थ्यांना व शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा यांनी १४२ विद्यार्थ्यांना पोलीस भरती करुन चांगले कार्य केल्याने तसेच अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, गोदावरी परुळेकर म हाविद्यालय, तलासरी व शिव छत्रपती महाविद्यालय पाचोड यांनी करिअर कट्टा उपक्रमात चांगले योगदान दिल्याबद्दल पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी करिअर कट्टा माहिती पुस्तीकेचे प्रकाशन श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी श्री. गायकवाड, श्री. घोरपडे, श्री. जैन आणि श्री. शितोळे यांनीही मनोगत व्यक्त केली.

कार्यक्रमाला करिअर कट्टाचे पुणे विभागाचे विभागीय समन्वयक डॉ. श्रीकांत देशमुख, पुणे जिल्हा समन्वयक डॉ. शिवाजी भोसले, शहर समन्वयक डॉ. प्रभाकर घोडके, राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्य, करिअर करिअर कट्टाचे विभागीय, जिल्हा समन्वयक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे एकमेव मराठी वृत्तपत्र
जागृत शोध
JAGRUT SHODHA
RNI.Reg.No.MAHMAR/2009/37305

## अजितदादा म्हणजे कामाचा माणूस

# आम्ही जनरल पब्लिक आम्हाला तुमच्या बद्दल आदर

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल जनतेच्या भावना; वंदे भारत ट्रेनमध्ये अजितदादांचीच क्रेझ

मुंबई, दि. १५:- वेळ सकाळी सहा वीसची... ठिकाण ठाणे रेल्वे स्टेशन... राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कार्यक्रमासाठी वंदे भारत ट्रेनने नाशिककडे प्रवास... या प्रवासात एक ज्येष्ठ नागरिक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शेजारी बसतात भारावून जाऊन त्यांना सांगतात दादा तुम्ही कामाचे लोक, आम्हाला बाकी कशाशी घेणे-देणे नाही. अजितदादा म्हणजे कामाचा माणूस, आम्ही जनरल पब्लिक तुमच्याबद्दल आदर...अशीच जनतेची कामे करा, बेस्ट लक दादा... आज वंदे भारत ट्रेनमध्ये अशाच अनेकांच्या भावना होत्या.

आज शनिवारी (दि.१५ जुलै) नाशिक येथे आयोजित 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार वंदे भारत ट्रेनने सकाळी नाशिककडे रवाना झाले. नेहमी प्रमाणे वृत्तपत्रे वाचत अजित पवार यांचा प्रवास सुरु झाला. मात्र या प्रवासात सहप्रवासी असलेले एक ज्येष्ठ नागरिक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शेजारी येऊन बसले. दादा तुम्ही कामाचे लोक, आम्हाला बाकी कशाशी घेणे-देणे नाही. अजितदादा म्हणजे कामाचा माणूस, आम्ही जनरल पब्लिक तुमच्याबद्दल आदर...अशीच जनतेची कामे करा, बेस्ट लक दादा... अशा शब्दात त्यांनी जणू राज्यातल्या जानेतेचीच प्रतिनिधीक भावना व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुद्धा जे शक्य आहे, लोक हिताचे आहे ते करत राहणार, काही सूचना असतील तर करा असे सांगत आपल्या सोबत असणाऱ्या विशेष कार्य अधिकाऱ्यांना त्यांची नोंद घेण्यास सांगितले. प्रवासात इतर प्रवाशांना त्रास होऊ नये, कोणाला अडवू नका अशा सूचना आपल्या सुरक्षा राक्षकांना केल्या. अशा प्रकारे वंदे भारत ट्रेनने अजितदादांची क्रेझ अनुभवली.



---

## नागरदेवळे येथे संत सावता महाराज पुण्यतिथी सोहळा निम्मित सप्ताहास प्रारंभ

नगर-येथील नागरदेवळे येथे संत सावता महाराज पुण्यतिथी सोहळा निम्मित दि.१० ते १७ जुलै पर्यंत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून सप्ताहास प्रारंभ करण्यात आला आहे

सप्ताह मधील दैनंदिन कार्यक्रम पुढील प्रमाणे दैनंदिन कार्यक्रम पहाटे ५ ते ६.३०काकडा भजन,स.९ ते १२.३०ज्ञानेश्वरी पारायण,दु.३ते ५ संत सावता माळी ग्रंथ वाचन,सायं.५ते ६ हरिपाठ,रात्री ७ ते ९ हरिकिर्तन होणार आहे यामध्ये कन्हेरकर महाराज,चंद्रकांत महाराज खळेकर,अँड.सुनिल महाराज तोडकर,सागर महाराजबेलापूकर,बबन महाराज बहिरवाल,केशवमहाराज उखळीकर(भागवताचार्य),श्रीनिवास महाराज घुगे(रामायणाचार्य),गुरुवर्य जंगले महाराज शास्त्री यांचे कीर्तन होणार आहेत

सप्ताहमध्ये दुपारी व रात्री सर्वासाठी महाप्रसाद,पंगत ठेवण्यात आली आहे त्यामध्ये कै.मच्छिंद्र सहादू घाडगे स्मरणार्थ दिपक मच्छिद्र घाडगे कडून,,सिध्देश्वर मित्र मंडळ, घाडगेमळा, मल्हारी भागुजी पानमळकर,संतोष रामभाऊ शेलार,राकेश राधाकिसन ताठे,अभिजीत अनिलराव झोडगे,नागुजी मामा राऊत पुण्यतिथी,राहुलजी पानसरे(पं.स.सदस्य),ठकनराव सत्रे यांच्या स्मरणार्थ विलास ठकन सत्रे,गोपाळराव झोडगे यांच्या स्मरणार्थ संदेश गोपाळराव झोडगे यांच्याकडून,सतिष रामचंद्र शिंदे,भुषण भुजबळ,गणेश घाडगे,गणेश वराडे,राजु(पोपट) धाडगे. सावता मंडप डेकोरेटर्स,गणेश पानमळकर,दत्ता काटकर,राजु घोलप,विठ्ठल घाडग,नारायण घाडगे,पांडुरंग घाडगे,रावसाहेब तुपे,सरपंच राम शंकरराव पानमळकर यांच्या वतीने होत आहे

रविवार दि.१६ जुलै रोजी सायं.४ वा.भव्य दिंडी मिरवणुक व १७ जुलै रोजी स.१० ते १२ काल्याचे किर्तन वनंतर महाप्रसाद भंडारा होणार आहे सप्ताह मध्ये मृदंगसम्राट किशोर गडाख ,गायनाचार्य सर्वश्री वारकरी भुषण शिवाजी महाराज कापडी,चंद्रकांत डेंगळे,विकास दरवडे ,सुप्रसिध्द तबला वादक शेखर दरवडे असून साथसंगत समस्त नागरदेवळे,सावतानगर,बाराभाबळी,बुऱ्हाणनगर,कापुरवाडी भजनी मंडळ आहेत तर निष्ठावंत वारकरी पुरस्कार सुनिताताई व सुधाकर घाडगे तसेच कमलताई व पांडुरंग धाडगे हे आहेत





तरी सर्व भाविकांनी रोजच्या कार्यक्रमास व कीर्तनास उपस्थित राहावे असे आवाहन नागरदेवळे भजनी मंडळ व समस्थ ग्रामस्थ नागरदेवळे, ता.नगर यांनी केले आहे

---

## महिला व बालविकास आयुक्तांची बालसुधार केंद्राला अचानक भेट

पुणे, (प्रतिनिधी)- महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी गुरुवार रात्री येरवडा येथील पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग (बालसुधार) केंद्राला अचानक भेट दिली व बालसुधारगृहात मुलांना प्रत्यक्ष देण्यात येणाऱ्या सुविधांची पाहणी केली.

यावेळी डॉ.नारनवरे यांनी मुलांची राहण्याची सोय, त्यांना देण्यात येणारे जेवण, सुविधा, शासनाकडून देण्यात येणारी मदत आदींची माहिती घेतली. येथे असणाऱ्या २२ विधि संघर्ष ग्रस्त मुलांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी बालविकास उपायुक्त राहुल मोरे, रचना व कार्यपद्धती अधिकारी गोविंद इसानकर, पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग (बालसुधार) केंद्राचे अधिक्षक दत्तात्रय कुटे, उपअभियंता नितीन पवार व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## अजित पवार यांच्याकडून कामकाजाला सुरुवात वित्त विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन घेतला कामकाजाचा आढावा

मुंबई, (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राज्याच्या वित्त व नियोजन विभागाच्या मंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आहे तत्पूर्वी सकाळी त्यांनी दोन्ही विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंत्रालयात बैठक घेऊन वित्त व नियोजन विभागाच्या सद्यस्थितीची माहिती तसेच कामकाजाचा आढावा घेतला. अतिरिक्त मुख्य सचिव नितीन करीर, अतिरिक्त मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे वित्त व नियोजन विभागाच्या मंत्रिपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयातील त्यांच्या दालनातून कामकाजाला सुरुवात केली. सकाळी लवकर मंत्रालयात आलेल्या अजित पवार यांनी वित्त व नियोजन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतल्यानंतर ते अभ्यागत नागरिकांना भेटले.

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांचे कार्यालय मंत्रालयातील पाचव्या मजल्यावरील ५०३ क्रमांकाचे दालनात असून या दालनातूनच ते आपल्या विभागांचे तसेच उपमुख्यमंत्रीपदाचे काम काज पाहणार आहेत.



---

## उत्पादक कंपन्यांनी नोंदणीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

पुणे (प्रतिनिधी)- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत संरक्षित शेती घटकांतर्गत पुरवठा करणाऱ्या उत्पादक कंपन्यांची नोंदणी प्रक्रिया सुरू असून कंपन्यांनी नोंदणीसाठी १४ ऑगस्ट पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन संचालक राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ यांनी केले आहे.

संरक्षित शेती घटकांतर्गत हरितगृह, शेडनेटगृह, प्लास्टिक मल्चिंग, द्राक्ष पिकांसाठी प्लास्टिक कव्हर, डाळिंब पिकासाठी न्टी हेल नेट या घटकांचा समावेश आहे. कृषी विभागाच्या योजनेअंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य पुरवठा व्हावा व साहित्याची गॅरंटी, वॉरंटी व दुरुस्ती याबाबत हमी मिळावी यासाठी उत्पादक कंपन्यांची अटी व शर्तीच्या अधीन राहून उत्पादक कंपन्याचे नोंदणीकरिताचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

उत्पादक कंपन्यांच्या नोंदणी प्रक्रियेबाबतच्या अटी व शर्ती www.mahanhm.in किंवा www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या संकेतस्थळावर भेट देवून उत्पादक कंपन्यांनी अर्ज करावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## भोर-वेल्हा उपविभागातील दाखले निर्गमित करणारा कक्ष सुट्टीच्या दिवशी सुरू राहणार

पुणे, (प्रतिनिधी)- भोर-वेल्हा उपविभागातील दाखले निर्गमित करणारा व संकलित करणारा कक्ष सुट्टीच्या दिवशी म्हणजे शनिवार १५ जुलै आणि रविवार १६ जुलै रोजी सुरू राहणार असून नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन भोरचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे यांनी केले आहे.

सद्यस्थितीत महाविद्यालयीन प्रवेशासाठी, विविध विभागांच्या भरतीसाठी, आवश्यक असलेले उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, ई.डब्लू.एस. प्रमाणपत्र आदी कागदपत्रांची आवश्यकता असते. त्यासाठी भोर उप विभागातील सर्व महा-ई-सेवा केंद्र, तहसिल कार्यालय भोर, वेल्हा आणि उपविभागीय अधिकारी कार्यालय भोर या कार्यालयातील दाखले निर्गमित करणारा कक्ष सुरू राहणार आहे.

विद्यार्थी, पालक यांनी तात्काळ या कार्यालयाशी संपर्क साधून विहीत मुदतीत दाखले प्राप्त करुन घ्यावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंतांना मानधन योजनेच्या लाभार्थींना आवाहन

मुंबई (प्रतिनिधी)- राज्यातील राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना मानधन योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या काही जुन्या लाभार्थींची परिपूर्ण माहिती अद्ययावत करण्याचे काम सुरु आहे. त्यासाठी लाभार्थींनी आपले आधार कार्ड, भ्रमणध्वनी क्रमांक, हयातीचा दाखला व मानधन जमा होत असलेल्या बँक खात्याच्या पासबुकच्या छायांकित प्रती तालुक्याच्या ठिकाणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती या ठिकाणी जाऊन जमा कराव्यात, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

मुंबई शहर व मुंबई उपनगरमधील लाभार्थींनी आपली माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालय जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, मुंबई -३२ या ठिकाणी द्यावी किंवा वलरारपवहरपसारळश्र.लो या ईमेलवर पाठवावी, असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

---

## बालविवाह प्रतिबंधक कायदा कृती आराखडा आढावा बैठक संपन्न

# कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे कार्य करावे- आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे

पुणे, दि. १४- बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीत बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांचीभूमिका महत्त्वाची आहे. अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे कार्य करावे आणि बालविवाह रोखावे असे निर्देश राज्याचे महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे यांनी दिले.

राज्यातील विभागीय उपआयुक्त, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी-जिल्हा परिषद व जिल्हा बाल संरक्षण युनिट यांच्यासमवेत दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

कोरोनाकाळामध्ये व नंतर निर्माण झालेल्या समस्यांमध्ये आर्थिक टंचाई, मुलींवर लादण्यात आलेले विविध प्रकारचे निर्बंध, पैसे नसल्यामुळे मुलींची लग्न लावून जबाबदारीमधून सुटका करून घेण्याकडे असलेला कल, स्थलांतर, मुलींची सुरक्षा अशा विविध कारणांमुळे बालविवाहांची संख्या वाढत असल्याचे आढळून आहे. मात्र अवैधरित्या होणारे हे विवाह थांबवावे व मुलींचे आयुष्य सुरक्षित करावे यासाठी महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे कार्य करावे असे डॉ. नारनवरे यांनी सांगितले.

एप्रिल २०१८ पासून मार्च २०२३ पर्यंत बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांनी २७०७ बालविवाह रोखल्याची माहिती यावेळी देण्यात आली. गुन्हे दाखल करण्यात आलेल्या २३० प्रकरणाबाबतही अद्ययावत माहिती सादर करण्याचे बैठकीत सूचित करण्यात आले.

बालविवाह रोखण्यासाठी किशोरी गट तयार करणे, त्यांच्या आई-वडिलांचे समुपदेशन करणे, मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था करणे, बालिकांना वसतीगृहात प्रवेश देणे, सर्वाधिक बालविवाह होणाऱ्या ठिकाणचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश या वेळी डॉ. नारनवरे यांनी दिले.

बालविकास उपायुक्त राहुल मोरे, रचना व कार्यपद्धती अधिकारी गोविंद इसानकर व दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील सर्व विभागीय उपआयुक्त, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी-जिल्हा परिषद व जिल्हा बाल संरक्षण युनिटचे ३६ जिल्ह्यातील १३०पेक्षा जास्त अधिकारी बैठकीत सहभागी झाले होते.

संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे एकमेव मराठी वृत्तपत्र
JAGRUT SHODHA
RNI.Reg.No.MAHMAR/2009/37305

# मेहेराझाद भाविकांसाठी खुले

नगर-अवतार मेहेरबाबाची मेहेराबाद व मेहेराझाद ही दोन्ही ठिकाणे पाहण्यासारखी आहेत.दरवर्षी हजारो भाविक भारतातून परदेशातून या ठिकाणी सतत दर्शनासाठी येत असतात. कोरोना काळानंतर मेहेराझाद बंद ठेवण्यात आले होते येथील वस्तूंचे-वास्तूंचे जतन होण्यासाठी ट्रस्टचा प्रयत्न आहे १ जुलै पासून हे ठिकाण दर मंगळवार, गुरुवार व रविवारी सकाळी १० ते दुपारी १२.३० पर्यंत भाविकाना दर्शनासाठी व पाहण्यासाठी खुले करण्यात आले आहे अमरतिथी व बाबाच्या वाढदिवसानंतर दरवर्षी १ मार्च ते ३० जून पर्यंत हे ठिकाण ४ महिने भाविकांसाठी बंद असते आता सुरु झाल्याने भाविक दिलेल्या दिवशी व वेळेत दर्शनाला गर्दी करत आहेत

नगर-औरंगाबाद रोडवर नगरपासून १५ कि.मी.वर असलेल्या पिपळगाव माळवी- जवळील मेहेराझादला जाताना रस्त्यापासून मेहेराझादपर्यंत २ कि.मी. रस्त्याच्या दुतर्फा वडाची झाडे आहेत.शांत असलेल्या परिसरात बाबांची खोली आहे.त्या ठिकाणी १९४४ साली आश्रम बांधला.तेथेच त्यांचे महानिर्वाण झाले.येथे बाबांची गादी, बसण्याची खुर्ची व पादुका आहेत. अनेक परदेशी भाविकही येथे येतात.या ठिकाणी बाबांनी ज्या गाडीतून भारतभर प्रवास केला ती लाकडी केबिनही ठेवलेली आहे. जवळच टेकडी आहे व या ठिकाणी धर्मार्थ दवाखाना असून, जवळपासच्या ४० खेड्यातील लोक विनामूल्य लाभ घेतात.

याबाबत अधिक माहिती देताना डॉ मेहेरनाथ कलचुरी म्हणाले मेहेरझाद हे अवतार मेहेर बाबा आणि त्यांच्या निवासी स्त्री-पुरुष मंडळींचे घर आहे.अवतार मेहेर बाबांनी ३१ जानेवारी १९६९ रोजी त्यांचे शरीर मेहेरझाद येथे सोडले.येथे त्याच्या आठवणी आहेत येथील प्रत्येक ठिकाण आणि वस्तू त्याच्या कार्याचा आणि अस्तित्वाचा सुगंध येथे दरवळत आहेत.मेहेरझादचा फेरफटका मारणे म्हणजे बाबाच्या कार्याच्या प्रमुख टप्प्यात परत येणे होय.

चाळीसच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात मेहेराबादचा पाणीपुरवठा खूपच कमी होता. मेहेराबाद येथे राहणाऱ्या मंडळींची पाण्याची गरज कशी भागवायची यावर जवळपास रोजच चर्चा व्हायची. एके दिवशी बाबांनी पुरुष मंडळींना सांगितले की त्यांनी दुसरी जागा शोधण्याचा प्रयत्न करावा, अहमदनगरपासून फार जवळ नाही, फार दूर नाही. मालमत्तेने खालील अटी पूर्ण केल्या पाहिजेत त्यात पाण्याचा पुरेसा पुरवठा असावा,जवळच एक टेकडी असावी आणि थोडीशी निर्जन असावी जेणेकरून त्याला सहज त्रास होणार नाही. बाबांना आता आश्रमाचे विभाजन करायचे असल्याने सर्व मंडळी अशा मालमत्तेच्या शोधात होती अर्धी मंडळी मेहेराबाद येथे राहतील आणि उरलेली अर्धी मंडळी दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होतील.

पंधरा दिवसांत शिष्य विष्णूने स्थानिक पेपर्समध्ये पिंपळगाव-माळवीजवळील एका मालमत्तेची जाहिरात पाहिली जी बाबांच्या वैशिष्ट्यांशी जुळणारी दिसली. पिंपळगाव जलाशयाच्या बांधकामा दरम्यान वापरलेल्या या मालमत्तेचा आता लिलाव होणार होता.या मालमत्तेमध्ये ३/४ मैलांचा ॲप्रोच रोड,एक लहान कॉटेज जिथे जलाशयाच्या इमारतीचे पर्यवेक्षण करणारे अभियंता त्याच्या बांधकामा दरम्यान राहिले होते, इतर काही खोल्या आणि जीर्ण संरचना यांचा समावेश होता.बाबांनी काही पुरुष मंडळींसोबत साइटला भेट दिली आणि त्यांनी जे पाहिले ते त्यांना आवडले.तलाव भरला होता, जवळच एक टेकडी होती आणि मालमत्तेला एक चांगली विहीर देखील होती. ३/४ मैल अप्रोच रोडसह मालमत्ता व कॉटेज आणि मालमत्तेवरील इतर काही बांधकामांसह लिलावात विकत घेतले गेले.

सुरवातीला बाबा काही माणसांच्या मंडळींसोबत काही तास येऊन जायचे,जेवण करून मेहेराबादला परतायचे. कधीकधी ते रात्रभर किंवा एका वेळी दोन किंवा तीन रात्री मुक्काम करत असे. मग ते त्याच्या कामासाठी टेकडीवर जाऊ लागले येथे बाबाप्रेमी आकाशाखाली राहत होतो, इथे काहीही नव्हते.ते टेकडीवर जायचे आणि आठवडाभर तिथे राहून खाली यायचो.त्यामुळे टेकडीवर निवारा बांधण्याचा विचार केला.बाबा म्हणाले,दोन बांधा एक माझ्या झोपेसाठी आणि एक माझ्या सार्वत्रिक कार्यासाठी.एप्रिल १९४४ पर्यंत बाबा काही स्त्री-पुरुष मंडळींना घेऊन पिंपळगाव विश्रामगृहात गेले. मालमत्तेवर कोणत्या इमारती आहेत त्यांची दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. १९४४ मध्ये, काळे मामा यांनी त्याच विद्यमान पायाचा वापर करून, मूळ जुन्या संरचनेच्या जागेवर महिलांसाठी लहान कॉटेजच्या बांधकामावर देखरेख केली.१९४८ पर्यंत आपण आज ज्याला बाबांचे घर म्हणून ओळखतो तो मुख्य बंगला बांधला गेला होता.

२७ ऑगस्ट १९४८ रोजी मुंबई, पुणे आणि अहमदनगर येथील त्यांच्या प्रेमींच्या छोट्या मेळाव्याद्वारे बाबांच्या घराचे अधिकृतपणे उद्घाटन करण्यात आले. याच प्रसंगी बाबांनी या मालमत्तेचे अधिकृत नाव मेहेरझाद म्हणजेच मेहेर फ्री असे ठेवले गेले नगर मधील व बाहेर गावावरून येणारे लोक डोंगरगण, मांजरसुंभा,गोरक्षनाथ गड,टेंभीचा खंडोबा, पिपळगाव माळवी तलाव आदी ठिकाणी येणारे भाविक-पर्यटक आवर्जून मेहेराझादला भेट देतात व माहिती घेऊन येथे नतमस्तक होतात

# जामखेड,शेवगाव, पाथर्डी कर्जत येथील एमआयडीसीला मंजुरी द्या

## उद्योगमंत्री उदय सामंत यांना बाबूशेठ टायरवालेचे निवेदन



नगर (प्रतिनिधी)- कर्जत- जामखेड मतदार संघातील कर्जत येथे औद्योगिक वसाहत क्षेत्र स्थापन होण्याच्या दृष्टीने औद्योगिक विकास विभागामार्फत सर्वेक्षण झालेले आहे. तसेच जामखेड व शेवगाव विधानसभा मतदारसंघात नवीन औद्योगिक वसाहत व्हावी त्यासंदर्भात ही आपण निर्णय घ्यावा. येथे औद्योगिक वसाहत तयार झाल्यास या दोन्ही मतदारसंघात विकासाला चालना मिळेल.कर्जत येथील औद्योगिक विकास क्षेत्रास असणाऱ्या उर्वरित मान्यता यांना आपण मंजुरी द्यावी तसेच जामखेड व शेवगाव येथील नविन औद्योगिक वसाहत होण्यास मान्यता द्यावी अशी मागणी शिवसेना मा. बाबुशेठ टायरवा अहमदनगर दक्षिण जिल्हा प्रमुख बाबुशेठ टायरवाले यांनी उद्योग मंत्री उदय सामंत याना प्रत्यक्ष भेटून निवेदनाद्वारे केली आहे यावेळी शिवसेना कर्जत-जामखेड विधानसभा प्रमुख दिपक जंजीरे पाटील उपस्थित होते

यावर मंत्री सावंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सीईओ याना तपासून कार्यवाही करावी असा आदेश दिला आहे दिपक जंजीरे म्हणाले यामुळे तालुक्यातील बेरोजगारी कमी होईल व युवकांच्या हाताला काम मिळेल व तालुक्याच्या विकासाला चालना मिळेल.

# श्रमिक बालाजी देवस्थानच्यावतीने सव्वा रुपयात सामुदायिक विवाह

नगर(प्रतिनिधी)-सावेडीतील श्रमिक नगर येथील श्री श्रमिक बालाजी देवस्थानच्या ३० व्या वार्षिक महोत्सवा निमित्त श्री व्यकंटेश्वर कल्याणम सोहळा शनिवार २६ ऑगस्ट रोजी दुपारी संपन्न होणार आहे त्याच सभामंडपात सव्वा रूपयात सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला आहे. सामुदायिक विवाह ही काळाची गरज आहे,दिवसेदिवस विवाह सोहळयाकरीता लागणारा खर्चही वाढत आहे.यामुळे गोरगरीबांना विवाह समारंभ करणे परवडत नाही गोरगरीब व सर्व जाती बांधवाचे हित हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून टस्ट हा उपक्रम गेली ११ वर्षे दरवषी सातत्याने करण्यात येत आहे आहे

आतापर्यंत १९० विवाह या माध्यमातून झाले आहेत.यामध्ये सहभागी होणाऱ्या जोडप्याला संसार उपयोगी साहित्य,मुलीला शालू,मुलाला कपडे,मणी मंगळसूत्र लोकसहभागातून देण्यात येते या विवाह सोहळयाचा लाभ हिंदू धर्मातील सर्व जातीच्या वधू वरांना सहभाग घेता येईल. त्यासाठी इच्छुकांनी विवाहसाठी लागणारे कागदपत्रे सह आपली नावे रविवार दि १३ ऑगस्ट पर्यत श्रमिक बालाजी मंदिरात सायं ६ ते ९ या वेळेत नोंदवावीत यामध्ये शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला,आधार कार्ड झेरॉक्स तसेच मुलाचे वय २१ वर्षे व मुलीचे वय १८ वर्षे पुर्ण आवश्यक,जर अंतर जातीय विवाह असेल तर आई-वडीलांची संमती पत्रक असणे आवश्यक,मुलाचे व मुलीचे पासपोर्ट साईज फोटो प्रत्येकी दोन, रेशन कार्ड, आधार कार्ड व फोटो असलेले ओळखपत्र झेरॉक्स प्रत,१०० रुपयाचे स्टॅम्प पेपर मुलाच्या वडीलांच्या नावाने व हस्ते मुलीच्या वडीलांच्या नावाने असणे आवश्यक,प्रत्येकी २ साक्षीदार त्याची नावे संस्थेची सव्वा रुपयाची पावती करणे आवश्यक.वरील सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे..

सोहळयाचा उपक्रम संस्थेच्या वतीने श्री श्रमिक बालाजी मंदिरात करण्यात येईल या सामुदायिक विवाहात जास्तीत जास्त वधू वरांनी सहभाग घ्यावा. इच्छुकांनी आपली नावे बालाजी मंदिरात नोंदवावीत असे आवाहन श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्था(ट्रस्ट)वतीने करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी विनोद म्याना मो ९८५०६७७७७४, नारायण यन्त्रम मो.९४२०८०२०१०, किसनराव बोमादंडी मो.९९७५३९४४६० , अंबादास महेसुनी मो.९६५७६१०९१२, ज्ञानेश्वर सुंकी मो.९८९०८७४९४८,गणेश येमुल मो.९४२३७५०७४८ यावर संपर्क साधावा

# आपण आपले संस्कार विसरत चाललो- तोडकर महाराज

नगर(प्रतिनिधी)-छत्रपती शिवाजी महाराजांनी जे हिंदवी स्वराज्य आणि स्वराज्यातील सुराज्य शासन आपल्याला सोपवले आहे त्याचे पालन ज्याप्रमाणे धर्मवीर संभाजी महाराजांनी केले प्राण्याचे बलिदान दिले परंतु धर्म परिवर्तन केले नाही परंतु आपण आज समाजात लव्ह जिहाद पहिले तर आपल्याला शरमेने मान खाली घालावी लागते यासाठी आपणच जबाबदार आहोत आपल्यावर झालेला पाश्चिमात्य संस्कृतीचा हा परिणाम आहे व आपणच आपले संस्कार विसरत चाललो आहोत असे प्रतिपादन सुनील महाराज तोडकर यांनी केले

संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७२८ पुण्यतिथी निमित्त नागरदेवळे येथील संत शिरोमणी सावता महाराज मंदिर, समस्त ग्रामस्थ आयोजित अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजलेल्या कीर्तनात माळी महासंघ वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुनील तोडकर महाराज बोलत होते हिंदू धर्म या विषयावर त्यानी किर्तन केले





त्यानी हिंदू धर्म संस्कार, संस्कृती, इतिहास बाबत,युवा,युवती, महिलाना विशेष प्रबोधन केले

ते पुढे म्हणाले आपण आपली हिंदू संस्कृतीचे आचरण करत नाही,आपण संतांचे चरित्र वाचन करत नाही, शिवाजी महाराज-संभाजी महाराजांचे चरित्र मुलांना सांगत नाही त्यासाठी सर्वांनी संत तसेच थोर पुरुष यांचे चरित्र वाचले पाहिजे. संस्कृतीचा परिणाम असा होतो की पहिले गुरुकुल पद्धती भारतामध्ये होती त्यामध्ये प्रभू श्रीरामचंद्र यांनी देखील गुरु वशिष्ठ महाराज यांचे आश्रमात जाऊन संस्कार घेतले तसेच श्रीकृष्ण भगवान आणि देखील गुरु संदीप आणि यांच्याकडे जाऊन संस्काराचे धडे घेतले आज जर पाहिले तर आपण आपल्या मुलांना संस्काराचे धडे देतो का याचा प्रत्येकाने विचार करावा

किर्तनास नागरदेवळे पंचक्रोशितील ग्रामस्थाचा उत्सुफुर्त प्रतिसाद मिळाला संतपुजा मोहन धाडगे हरिओम सप्लार्य,गोकुळ धाडगे,संतोष धाडगे,गिलचे परिवार यांनी केली ,यावेळी पगंतसेवा पंचायत समिती सदस्य राहुल पानसरे यांनी केली, यावेळी सरपंच राम पानमळकर(धाडगे),बेलेश्र्वर कट्राकशनचे संचालक महेशभाऊ झोडगे,माळी महासंघचे कर्मचारी आघाडी दक्षिण जिल्हध्यक्ष नंदकुमार नेमाने,जिल्हा उपाध्यक्ष तुषार फुलारी, भिगांर शहर अध्यक्ष संदीपभाऊ दळवी,शहर अध्यक्ष नितीनभाऊ डागवाले,कर्मचारी शहर कार्यध्यक्ष गणेश धाडगे वतीने पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला,कीर्तनात नेहरू या केंद्राचे एड महेश शिंदे,छावा संघटनेचे अध्यक्ष रावसाहेब काळे,एड दिनकर कराळे,महाराष्ट्र राज्य वारकरी संघाचे उपाध्यक्ष विजय भालसिंग, नगर शहर वारकरी संघाचे कार्याध्यक्ष महेश कांबळे आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने भाविक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने विद्युत महावितरणांच्या अधीक्षक अभियंता यांना निवेदन

## नालेगाव व नेप्ती शिवारातील कल्याण रोड ते निंबळक पर्यंत शेतकऱ्यांना विद्युत कनेक्शन देण्याची मागणी; शेतकऱ्यांसह १५ ऑगस्ट ला आमरण उपोषण करण्याचा इशारा

अहमदनगर (प्रतिनिधी)- नालेगाव व नेप्ती शिवारातील कल्याण रोड चौफुला ते निंबळक पुलापर्यंत रोड लगत अंदाजे ३ किलोमीटर अंतरासाठी शेतकऱ्यांना शेती कामासाठी विद्युत कनेक्शन जोडणीच्या मागणीसाठी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने विद्युत महावितरणाचे अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर यांना निवेदन देताना महिला जिल्हा अध्यक्षा सुरेखाताई सांगळे समवेत पश्चिम महाराष्ट्र युवक आघाडीचे सचिव दत्ताभाऊ वामन, रावसाहेब काळे, सुनील सकट, सुनील ठाकरे, महेश नल्ला, बाळासाहेब बेल्हेकर, भैया पठाण, विलास नंदी, बबू सय्यद, काशिनाथ रोहोकले, गणेश लांडे आदीसह शेतकरी उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की. नालेगाव व नेप्ती शिवारातील शेतकऱ्यांनी वरील संदर्भीय विषयानुसार वेळोवेळी निवेदन करूनही व प्रत्यक्ष भेट घेऊन ही मागणी केलेली आहे. तरी २ वर्ष ९ महिने होऊन देखील अद्याप पर्यंत कुठल्याही प्रकारचे उत्तर अथवा कामकाज झालेले दिसत नाही. प्रशासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतलेली नसून संबंधित विभागाने लवकरात लवकर शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्यात यावे अन्यथा १५ ऑगस्ट रोजी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांसह आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



जागृत शोध हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर यांनी शिवकृपा प्रिंटर्स माळीवाडा अहमदनगर येथे छापुन, नगर- कल्याण रोड भावनाऋषी अहमदनगर ४१४००१ येथे प्रकाशित केले. संपादक- भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर मो. नं. ८००७०७२८२८, कार्यालय-कुंभार आळी, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे ४१२२१० jagrutshodha@gmail.com